## कोकण भूमी प्रतिष्ठान - ध्येयपूर्ती

- गेली २० वर्षापासून कोकणाला समृध्द करण्यासाठी ही चळवळ कार्यरत आहे.
- ग्लोबल कोकण फेस्टीव्हल हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा महोत्सव गेली ८ वर्षे आयोजित केला जात असून याव्दारे कोकणचा जागतिक ब्रॅन्ड तयार करण्यास मदत झाली आहे. या महोत्सवाला दरवर्षी ३-४ लाख लोक भेट देतात.
- मार्गदर्शन परिषदा, प्रशिक्षण, अभ्यासदौरे, पर्यटन महोत्सव यांसारखे २०० हून अधिक कार्यक्रम प्रतिष्ठानने केले असून यामध्ये आतापर्यंत २०,००० हून अधिक कोकणवासिय सहभागी झाले आहेत.
- या चळवळीच्या प्रेरणेतून आणि सहकार्यातून कोकणामध्ये ५०० हून अधिक प्रकल्प उभे राहिले आहेत.
- आमचे मार्गदर्शक माजी मुख्य सचिव मा. द.म.सुकथनकर आणि स्व. अरुण बोंगिरवार यांच्या मार्गदर्शनातून ग्रामीण व सागरी पर्यटन विकास योजना शासनाला सादर करण्यात आली. या योजनांतर्गत कोकणात २० ग्रामीण पर्यटन प्रकल्प उभारण्याचे काम सुरु करण्यात आले आहे.
- जलपुरुष डॉ. राजेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनातून समृध्द कोकण संघटनेने - ४ नदयांचे पुर्नज्जीवन कार्यक्रम सुरु केला आहे व यातून अनेक गावात जलक्रांतीची सुरुवात झाली आहे.
- पर्यटन, मत्स्य, आधुनिक शेती यासाठी दरवर्षी अर्थसंकल्पामध्ये १००० कोटींची तरतूद करावी आणि या विषयात प्रकल्प उभारणाऱ्यांना योजना, सबसिडी देण्यात याव्यात. याकरिता संपूर्ण कोकणात आणि मुंबईत महाआंदोलन आयोजित करण्यात आले याचा परिणाम म्हणून स्वतंत्र कोकण पर्यटन विकास समिती निर्माण करण्यात आली आणि या समितीला १०० कोटीहून अधिक निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.
- मत्स्य विभाग, महाराष्ट्र शासन यासोबत समन्वय करुन Blue Revolution योजना कोकणात राबवणार आहोत.

**कोकणातील २५ आदर्श प्रकल्प हे कोकण भूमी प्रतिष्ठान सोबत संलग्न असून याठिकाणी मत्स्य, पर्यटन, शेती, मसाले पिके व इतर विषयांवरील प्रशिक्षण आणि परिषदांचे आयोजन केले जाईल.**

### कोकण बिझनेस फोरम - कार्यकारिणी

**संजय यादवराव**
संस्थापक

**अनंत भालेकर**
अध्यक्ष

**नरेंद्र बामणे**
कार्याध्यक्ष

**राम कोळवणकर**
सरचिटणीस

**रवी परब**
खजिनदार

**राजश्री यादवराव**
संघटक

**सचिन कोठारकर**
समन्वयक

**भूषण सावे**
पालघर

**शिरीष झारापकर**
रत्नागिरी

**प्रकाश देशमुख**
रायगड

**अविनाश पराडकर**
सिंधुदूर्ग

११५, मिठा चेंबर (सत्यगिरी) २, भरतक्षेत्रच्या समोर, दादासाहेब फाळके रोड, दादर (पूर्व), मुंबई -१४
8097777817 /8850807227 / 022-24155412
infokokanclub@gmail.com www.kokanclub.org / www.globalkokan.org



कोकण बिझनेस फोरम

सर्वांगीण विकासाचे संघटीत अभियान

# कोकण बिझनेस फोरम

## कोकणातील उद्योजकांचे व्यासपीठ...



# कोकण बिझनेस फोरम
# कोकणी उद्योजकांचे व्यासपीठ

कोकणातील उद्योजकांनी एकत्र येऊन एकमेकांना मदत करावी. आपला उद्योग पुढे न्यावा याचबरोबर कोकणातील विकास प्रकल्पांची माहिती घ्यावी. कोकणात गुंतवणूक करावी, प्रकल्प उभारावेत यासाठी कोकण उद्योजक प्रतिष्ठान अंतर्गत कोकण बिझनेस फोरम सुरु करीत आहोत. बिझनेस फोरमच्या माध्यमातून दरमहा एकत्र यावे, एकमेकांना मदत करावी, आपआपल्या ज्ञानाची एकमेकांबरोबर देवाण - घेवाण करावी व यातून व्यवसाय वृध्दी व्हावी असा प्रयत्न आहे.

## कोकण उद्योजक प्रतिष्ठान :-

सर्वात मोठी बाजारपेठ व एकविसाव्या शतकातील महासत्ता म्हणून साऱ्या जगाचे लक्ष भारताकडे आहे. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईकडे पाहिले जाते. ही मुंबई हळूहळू कोकणच्या दिशेने सरकत आहे. पुढील काळात संपूर्ण कोकण प्रचंड वेगाने विकसित होणार आहे. कोकणात येवू घातलेली लाखो कोटींची गुंतवणूक, पर्यटन, हापूस आंबा, फळप्रक्रिया अशा अनेक उद्योगांच्या संधी यामुळे निर्माण होणार आहेत. अशा अवस्थेत कोकणातील तरुण उद्योजक, व्यावसायिक, प्रगतीशील शेतकरी यांनी संघटीत होवून कोकण विकासाच्या प्रक्रियेत सहभागी झाले पाहिजे. एकमेकांना सहकार्य केले पाहिजे. जास्तीत जास्त रोजगारांच्या संधी स्थानिकांना कशा मिळतील याकरिता प्रयत्नशील राहिले पाहिजे. सर्व कोकणी उद्योजकांना व प्रगतीशील तरुणांना एकत्र आणून कोकणचा आर्थिक विकास व्हावा याकरिता "कोकण उद्योजक प्रतिष्ठान अंतर्गत कोकण बिझनेस फोरम" ची स्थापना झाली. कोकण व्हिजन २०२० परिषद, मुंबईतील कोकण व्हिजन महोत्सव, रत्नागिरीतील दिशा २००९, श्रीवर्धन बिच फेस्टीव्हल, गुहागर बिच फेस्टीव्हल, ग्लोबल कोकण यासारखे अनेक उपक्रम कोकण उद्योजक प्रतिष्ठानच्या माध्यमातून राबविले आहेत. कोकणचे नाव जगभरात जावे याकरिता पर्यटन महोत्सव आम्ही ठिकठिकाणी आयोजित करतो. कोकणातील उद्योजक, व्यावसायिक, प्रगतीशील शेतकरी यांना एका व्यासपिठावर आणून पुढील १५-२० वर्षात समृध्द कोकण निर्माण करावे याकरिता कोकण बिझनेस फोरमची स्थापना झाली.

## कोकण बिझनेस फोरम सहभाग शुल्क :

| | | |
|---|---|---|
| **नोंदणी शुल्क** | - | **रु. १०००/-** |
| **देणगी (वार्षिक)** | | **शुल्क** |
| आश्रयदाते | - | रु. १,००,०००/- किंवा अधिक |



## सदस्यांसाठी सुविधा

| आश्रयदाते | प्रमुख मार्गदर्शक | उद्योजक मार्गदर्शक |
|---|---|---|
| • माहिती पत्रकात आश्रयदाते म्हणून नाव.<br>• मुंबईतील परिषदेमध्ये सत्कार<br>• वर्षभरातील ६ मोठ्या परिषदांमध्ये लोगो प्रसिध्दी.<br>• कार्यक्रमामध्ये विशेष निमंत्रित म्हणून सन्मान<br>• वेबसाईटवर लोगो प्रसिध्दी | • माहिती पत्रकात उद्योजक मार्गदर्शक म्हणून नाव.<br>• कोकणातील परिषदेमध्ये सन्मान.<br>• कार्यक्रमांमध्ये विशेष निमंत्रित म्हणून सन्मान<br>• वेबसाईटवर लोगो प्रसिध्दी | • माहिती पत्रकात उद्योजक मार्गदर्शक म्हणून नाव.<br>• कार्यक्रमांमध्ये विशेष निमंत्रित म्हणून सन्मान<br>• वेबसाईटवर लोगो प्रसिध्दी |

## व्हिजन

संपूर्ण कोकण प्रदेशाची उद्योजकांचा प्रदेश म्हणून ओळख निर्माण करणे, एका समृध्द् प्रदेशाच्या निर्मितीसाठी कर्तृत्ववान कोकणवासीयांना संघटीत व्यासपीठ, सहकार्य, मार्गदर्शन व व्यावसायिक संधी उपलब्ध करुन देणे.

## मिशन

- कोकणातील कर्तृत्ववान उद्योजकांच्या सहाय्याने / सहकार्याने समृध्द कोकणची निर्मिती करणे.
- प्रामुख्याने पर्यटन, मत्स्य, शेती, फलोद्यान, प्रक्रिया आणि उद्योग यामध्ये कोकणातील नैसर्गिक साधन संपत्तीतून कोकणात अनेक प्रकल्प निर्माण करणे.
- फोरमच्या संघटीत व्यासपीठाच्या माध्यमातून सरकारकडून आवश्यक त्या पायाभूत सुविधा, सवलती व इतर सुविधा मिळवून देणे.
- उपरोक्त उद्योगांसाठी पुरक धोरणे अणि प्रोत्साहनपर योजना करण्यासाठी शासनाला उदयुक्त करणे आणि प्रकल्प उभारताना सरकारी योजनेचे समन्वय करणे.
- फोरमच्या माध्यमातून ५००हून अधिक जॉईन्ट व्हेंचर, अलायन्सच्या मदतीने नवीन व मोठे उद्योग समूह निर्माण करणे.
- फोरमच्या माध्यमातून १०००० हून अधिक सक्षम उद्योजक तयार करणे.
- एकत्रीत मार्केटिंग करुन कोकणचा ब्रॅन्ड निर्माण करणे आणि सभासदांनी एकत्रीत येऊन मोठे प्रकल्प निर्माण करणे.

## कोकण बिझनेस फोरम सभासदांसाठी विशेष सुविधा

- समृध्द कोकण संघटनेच्या सदस्यांना मिळणाऱ्या सर्व सुविधा बिझनेस फोरमच्या उद्योजकांना मिळतील.
- फोरमच्या माध्यमातून दर सहा महिन्यांनी एक स्नेहभोजनाचा आणि प्रत्येक महिन्यात एक चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला जाईल. यात कोकणातील मोठे उद्योजक सहभागी होतील. यातून सर्व कोकणी उद्योजकांना एकत्र आणून उद्योगवाढीसाठी प्रयत्न केले जातील.
- सर्व सदस्यांसाठी नियमितपणे काही व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जातील.
- कोकण उद्योजक प्रतिष्ठानव्दारे होणाऱ्या अभ्यासदौरा, ॲग्रो मॅनेजमेंन्ट ट्रेनिंग यामध्ये सवलत.
- कोकणातील प्रकल्प, जमिन व नविन येणाऱ्या संधी यांची माहिती मिळेल.

**नोट - बैठका, स्नेहभोजन, विशेष प्रशिक्षण कार्यक्रमांना आवश्यकतेनुसार शुल्क आकारले जाईल.**